N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** आनंदनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0279 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/07/2023 00:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 15/07/2023

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/07/2023

**Time From (वेळेपासून):** 16:10 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/07/2023 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 038

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/07/2023 23:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सुनिल प्लाझा समोर रोडवर,उस्मानाबाद येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भागवत नाना जाधव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1946

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा जाधववाडी, ता जिउस्मानाबा,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा जाधववाडी, ता जिउस्मानाबा,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8080951344

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिरुध्द अंबऋषी कावळे | | | 1. रा केकस्थळवाडी ,ता जि उस्मानाबाद,आनंदनगर, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत<br>2. हमु बालाजी नगर, बेंबळी रोड, , उस्मानाबाद,आनंदनगर, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | बाबासाहेब हरिचंद्र अंधारे | | | 1. रा आनंदनगर, माणिक चौक गणपती ,मंदिराजवळ सपकाळ यांचे घरी उस्म,आनंदनगर, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |



Scanned with CamScanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद :-

मी भागवत नाना जाधव, वय 77 वर्ष, व्यवसाय शेती, रा. जाधववाडी, ता. जि.उस्मानाबाद, मो. नंबर 8080951344 आज दिनांक 15.07.2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर राहुन फिर्याद

देतो की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन, शेती व्यवसाय करुन माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे.

आज रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर राहून पोलीस निरीक्षक श्री. राठोड यांचकडे तक्रार दिली. त्यातील हकीकत अशी की, "माझी पत्नी नामे मोहरबाई भागवत जाधव हिचे नावे मौजे अंबेहोळ येथे शेत गट क्रमांक 40 मध्ये एकुण 04 एकर शेत जमीन असुन, सदरची जमीन ही सन 2013 मध्ये पाझर तलावासाठी शासनाने संपादीत केलेली आहे. सदर जमीन पाझर तलावात गेल्याने, त्यावेळी त्याचा मोबदला म्हणुन शासनाकडुन रु. 1.45,000/- मिळाला होता, परंतु सदरची जमीन शासनाने संपादीत केल्याने व माझे पत्नीला शासनाकडुन मिळालेली रक्कम कमी असल्याने, मी माझे पत्नीचे नावे उस्मानाबाद येथील दिवाणी कोर्टात दावा दाखल केला होता, त्याचा निकाल लागलेला असुन, त्यामध्ये उस्मानाबाद येथील कोर्टाने निकाल दिला असून, त्यात प्रति गुंठा रु. 5,000/- प्रमाणे मोबादला देणेबाबत शासनास आदेशीत केले आहे. परंतु कोर्टाने सदरचा निकाल पुर्णपणे आमचे बाजुने न दिल्याने, आम्ही पुन्हा हाय कोर्ट औरंगाबाद दिवाणी अर्ज नंबर 11889/2019 हा दाखल केला होता. त्याचापण निकाल लागलेला असुन, त्यामध्ये औरंगाबाद येथील कोर्टाने उस्मानाबाद येथील कोर्टा प्रमाणे निकाल दिलेला आहे. कोर्टाचा निकाल लागल्यापासुन आम्हाला शासनाने संपादित केलेल्या जमीनीचा अधिक मोबदल्याची रक्कम 26,56,017 व 4,31,798 /- रुपये मिळालेली नाही.

काल दिनांक 14.07.2023 रोजी कोर्टाने दिलेल्या आदेशा प्रमाणे शासनाने संपादित केलेल्या जमीनीच्या अधिक मोबदल्याची रक्कम मिळणे करीता भी उपविभागीय अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे जाऊन आमचे जमीनीचा मोबादल्याबाबत चौकशी केली असता, सदरचे काम हे उपविभागीय अधिकारी कार्यालय उस्मानाबाद येथील खरमाटे साहेब, अकुशे साहेब व नाईक साहेब यांचेकडे असल्याचे समजले. त्यावरुन मी खरमाटे साहेब, अंकुशे साहेब व नाईक साहेब यांची भेट घेऊन त्यांना माझे संपादीत केलेल्या जमीनीच्या अधिकच्या मोबदल्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी तुमचे प्रकरण हे औरंगाबाद येथे पाठविले आहे असे उत्तरे दिल्याने, मी तेथून बाहेर आलो असता, त्यावेळी तेथे माझे ओळखीचे आमचे गावचे जवळील केकस्थळवाडी येथील अनिरुद्ध कावळे हे माझेजवळ आले व मला म्हणाले की, तुमचे जमीनीच्या मोबदल्याचे बिलाचा चेक मी खरमाटे साहेब, अंकुशे साहेब व नाईक साहेब यांना सांगुन 04 दिवसात काढून देतो, त्यासाठी तुम्ही मला खरमाटे साहेब, अंकुशे साहेब व नाईक साहेब याना देण्यासाठी उद्या दिनांक 15.07.2023 रोजी दोन लाख रुपये आणुन द्या. त्यावेळी मी त्यांना माझे जवळ एवढे पैसे नाहीत



Scanned with CamScanner

असे म्हणालो, परंतु ते मला तुम्ही तेवढे पैसे दिल्याशिवाय तुमचा सदर बिलाचा चेक निघणार नाही. त्यामुळे मी नाविलाजास्तव त्यांना ठिक आहे. असे म्हणुन त्यांचेपासुन गावी गेलो" वगैरे मजकुरची तक्रार दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राठोड यांनी माझी व दोन शासकीय पंच 1. श्री सुनिल नरहरी टाकेकर, 2. राम प्रभाकर चव्हाण, दोघे कनिष्ठ सहाय्यक, जि. प. प्राथमिक शिक्षण विभाग, उस्मानाबाद तसेच पोलीस अमलदार यांचा आपसी परिचय करुन दिला. त्यानंतर पोनि राठोड यांनी पंच क्रमांक 1 म्हणुन सुनिल नरहरी टाकेकर व पंच क्रमांक 2 म्हणुन राम प्रभाकर चव्हाण यांची निवड केली. त्यानंतर राठोड साहेब यांनी मला माझी तोंडी तक्रार सांगण्यास सांगितली असता मी माझी तोंडी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर माझी कॉम्पुटरवर टाईप केलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. सदरची तक्रार दोन्ही पंचानी वाचुन पाहिली. मी सांगितलेली तोंडी व कॉम्पुटरवर टाईप केलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर मी दिलेली तक्रार पोनि राठोड साहेब यांनी स्वतः कडे ठेवुन घेतली.

त्यानंतर पोनि राठोड साहेब यांनी मला दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, माझ्याकडे माझे तक्रारीमधील कामासाठी अनिरुद्ध कावळे हे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत आज दिनांक 15.07.2023 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर राठोड साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना गोपनीयता बाळगण्याची सुचना दिली.

त्यानंतर राठोड साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोहेकॉ / जाधव यांनी एका काळ्या रंगाच्या बॅग मधुनः Sony कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढून मला व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यामध्ये 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SD HC 1 असे वर्णनाचे नमूद असलेले मेमरी कार्ड टाकले व राठोड साहेब यांनी कळविले की, लाच मागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार व अनिरुद्ध कावळे यांचेत होणारे मुळ संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार आहे. त्यानंतर पोहेकॉ / जाधव यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले नसले बाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून दिली.

त्यानंतर राठोड साहेब यांनी सूचना दिली की, मी पंच क्रमांक | सुनिल टाकेकर यांचेसह सुनिल प्लाझा. उस्मानाबाद येथे जावुन अनिरुद्ध कावळे यांची भेट घेवुन त्यांना माझे कामा बाबत बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे असे सांगितले.. तसेच पंच क्रमांक | सुनिल टाकेकर यांना देखील सुचना दिल्या.

त्यानंतर राठोड साहेब यांचे सुचनेवरुन पोहेकॉ / जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डडर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये बनियनला पीनने लावुन अनिरुद्ध कावळे यांची भेट घेण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथून मला व पंच क्रमांक 1 यांना रवाना केले. त्यानंतर आम्ही पंच क्रमांक | सुनिल टाकेकर यांचेकडील मोटार सायकल क्रमांक एमएच 24 एस 7176 वर सुनिल प्लाझा, उस्मानाबाद येथे अनिरुध्द कावळे यांची भेट घेण्यासाठी गेलो. सुनिल प्लाझा, उस्मानाबाद समोरे मोटारसायकल बाजुला लावली व समोर उभे असलेल्या इसमाकडे मी पंच क्रमांक 1 यांना हाताने इशारा करून हेच ते अनिरुद्ध कावळे असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही अनिरुद्ध कावळे यांचेजवळ पायी चालत गेलो. तेथे माझ्यात व अनिरुद्ध कावळे यांचेत माझे कामाबाबत बोलणे झाले. त्यावेळी सी अनिरुद्ध कावळे यांना काय परेशानी हाय. असे म्हणाले असता, त्यावर अनिरुद्ध कावळे यांनी काय झालय.. अजून असे म्हणाले. त्यानंतर अनिरुद्ध कावळे यांनी मला लगी हया पाच- सहा दिवसात काढून घेऊ असे म्हणाले असता. मी अनिरुद्ध कावळे यांना अकुशला, खरमाटेला सांगा तुम्ही.. असे म्हणालो असता कावळे यांनी सांगितलीय सगळ्याला.. आता विषय मिटला की... तुमचा कालच मिटला.. सगळ्याला सांगीतलय. विषय मिटला.. आता ती चेक आहे तुमचा.. ती हाय हायकोर्टात हाय. मागुन येणार.. आता ती हाय का.. 26-27 हजाराचा आता मिटणार हाय. असे म्हणाले. त्यानंतर मी कावळे यांना काय ते तेवढ कमी करायला लावा की, असे म्हणाले असता, कावळे यांनी मला आव त्यांनी तीन लाख रुपये सागीतल्यात की.. पण म्हणल की.. ती माणुस मरण म्हणल.. मी म्हणल त्याला कसतर दोन लाखपर्यंत जांगजोड करायला लावु म्हणल.. आल बगा पत्रकार बी., आल की नाही.. या गाडीकड पुढी घ्या.. हं.. बस असे म्हणाले. त्यावेळी तेथे अंधारे नावाचे पत्रकार आले. त्यांचेत अनिरुद्ध कावळे व माझेत माझ्या कामासंबंधी बोलेणे झाले. त्यानंतर पत्रकार यांनी मला तीस लाख.. असं धरून चालयच की..



Scanned with CamScanner

आपल्याला पंचवीसच लाख येणार आहेत... एका पाच लाख जाऊ या.. असे म्हणाले. त्यानंतर अनिरुद्ध कावळे यांनी मला असं असतय.. तुम्ही बी आता. ही जैसे दोन लाख द्यायला लागलाय म्हणनु रान उरकलय.. आम्ही.. नाहीतर आम्ही तरी कुठं पैसे दिल्याशिवाय कुठे

उरकणार हाय. असे म्हणाले. त्यानंतर मी पंचाना तेथुन निघण्याचा इशारा केल्याने आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे परत आलोत.

त्यानंतर राठोड साहेब यांनी पोहेकॉ / जाधव यांना हाताने इशारा करून माझ्याजवळील व्हॉईस रेकॉर्डर बंद करणेबाबत कळविल्याने पोहेकॉ / जाधव यानी माझे जवळील व्हाईस रेकॉउंडर काढुन बंद केले व मला बाजुच्या रुममध्ये जावून थांबण्यास सांगितले. त्यावरुन मी बाजुचे रुममध्ये जाऊन थांबलो. त्यानंतर थोड्या वेळाने राठोड साहेबांनी मला जवळ बोलावून हकीगत विचारली असता, मी वरील प्रमाणे हकीकत पंच क्रमांक 02 यांचे समक्ष सांगितली. यावरून माझ्या पत्नीचे नावे शासनाने संपादित केलेल्या जमीनीच्या अधिकचा मोबदल्याचा चेक खरमाटे साहेब, अंकुशे साहेब व नाईक साहेब यांना सांगुन मिळवून देण्यासाठी अनिरुद्ध कावळे व अंधारे यांनी 2,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.

अनिरुध्द कावळे व अंधारे यांनी माझे पत्नीच्या नावे शासनाने संपादित केलेल्या जमीनीच्या अधिकचा मोबदला मिळुन देण्यासाठी खरमाटे साहेब, अंकुशे साहेब व नाईक साहेब यांना देण्यासाठी अनिरुद्ध कावळे च अंधारे यांनी 2,00,000/- रुपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याने पोलीस निरीक्षक राठोड यांनी त्यांचे विरुद्ध आज दिनांक 15.07.2023 रोजी लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर राठोड साहेब यांनी सांगितले की, सापळापूर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यांचे सुचनेवरून मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिजवस्तु त्याचेकडे ऑफीसमधील टेबलावर काढनु ठेवल्या. त्यानंतर मी काढून ठेवलेल्या चिजवस्तु व्यतिरिक्त इतर काही माझेकडे नसल्याची खात्री करून मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 400 चलनी नोटा असे एकूण 2,00,000/- रुपयास अन्थ्रासीन पावडर लावणे, अॅन्थ्रासीन पावडरचे उपयोग, अॅल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग व गुणधर्म, त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन तसेच लाचेच्या नोटांची अंधारात अल्ट्राव्हायोलेटच्या दिव्याखाली तपासणी वगैरे कार्यवाही केल्यानंतर पोना/ शेवाळे यांनी सदर लाचेच्या नोटा माझेजवळील कापडी पिशवीमध्ये ठेवून दिल्या. त्यानंतर अनिरुद्ध कावळे व अंधारे यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारल्यानंतर मला डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढून खाली घेणेबाबत ईशारा मला नेमूण दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राठोड यांनी मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर राठोड साहेब यांच्या सांगण्यावरुन पोहेकॉ / जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SDHC I असे वर्णनाचे नमुद असलेले मेमरीकार्ड टाकले. सदर व्हॉईस रेकॉर्डर चालु करून पिनने माझे शर्टचे आत बनियनला पिनने लावुन पंच क्रमांक 1 याचेसह मला पंचाचे मोटारसायकलवर रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे त्यांचे मोटारसायकल क्रमांक एमएच 24 एस 7176 वर सुनिल प्लाजा समोर गेलो व तेथे मोटार सायकल बाजुला लावली. तेथे अनिरुद्ध कावळे व अंधारे हे न दिसल्याने मी पंच क्रमांक 1 यांचे मोबाईलवरुन अनिरुद्ध कावळे यांना फोन लावून पैसे घेवुन आलेबाबत सांगितले असता त्यांनी मला तुम्ही थांबा मी आलो असे सांगितले. त्यानंतर थोडया वेळात एका चार चाकी गाडीतून अंधारे तेथे आले व त्यांनी त्यांची गाडी पुढे काही अंतरावर नेहून बाजुला लावून ते माझे जवळ आले व ते मला कुठ गेलताव तुम्ही असे म्हणुन विचारल्यावर गावाकडे जावुन आलो जावई आला गाडीवर.. असे सांगितले. त्यानंतर ते मला काही टेन्शन घेवु नका.. होवुन जातय आता ही कलेक्टरपशी सोमवारी बसुन आपण ओके करुन घेवु .. तुम्ही जरा लवकर यायला पाहिजे होत ओ.. उशीर झाला. कावळेन मला सांगितल.. असे बोलले. त्याचेत व माझेत बोलणे चालु असताना अनिरुद्ध कावळे तेथे आले व ते माझेशी बोलू लागले नंतर ते दोघे मला त्यांचे चार चाकी गाडी क्रमांक एच एच 25 ए डब्ल्यु 9155 जवळ घेवुन गेले. ते मला गाडीत बसा असे म्हणत होते मी मी त्यांना नको म्हणालो. त्यावेळी त्यांनी त्याच्या गाडीचा दरवाजा उघडून ड्रायव्हर शिटवर अंधारे। परंतु पत्राकार व मागील शिटवर डावे बाजुस अनिरुद्ध कावळे हे गाडीमध्ये बसले व मी गाडीचे बाहेर अनिरुध्द कावळे



Scanned with CamScanner

याचे जवळ दरवाज्याजवळ उभा राहिलो. त्यावेळी त्यांनी माझेकडे पैश्याची मागणी केल्याने मी माझेजी 2,00,000 /- रुपये कापडी पिशवीतून उजव्या हाताने काढून अनिरुद्ध कापले यांचे समोर धरली असता त्यांनी 2,00,000/- रुपये उजव्या हाताने स्विकारून ते अंधारे पत्रकार माचेकडे दिले त्यावेळी मी मला नेमुन दिलेला ईशारा केला. ती वेळ साधारणतः 16.10 वा. ची होती. त्यानंतर तेथे लागलीच पोनि राठोड तसेच पंच क्रमांक 2 व सापळा पथक सदर ठिकाणी हजर आले त्यानंतर पोनि राठोड यांचे सुचनेवरून पोहेकॉ / जाधव यांनी मायेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद करून राठोड साहेब यांचेकडे दिले. तेव्हा राठोड साहेब यांनी सर्वासमक्ष अनि कावळे व अंधारे पत्रकार यांना त्यांचे नावाबाबत विचारले असता अनिरुद्ध कावळे यांनी त्याचे पुर्ण नाथ अनिरुद्ध बापी कावळे, वय 54 वर्ष, मुळ रा. केकस्थलवाडी ता. जि. उस्मानाबाद ह.मु. बालाजी नगर में रोड, उस्मानाबाद तसेच अधारे पत्रकार यांनी त्यांचे पुर्ण नाव बाबासाहेब हरिश्चंद्र अंधारे, वय 42 वर्ष, रा. आनंदनगर, गणपती मंदीराजवळ माणीक चौक, सकपाळ सर यांचे घरी उस्मानाबाद असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि राठोड यानी तेथे पुढील कार्यवाही करून, मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे ये बाबत सांगितले. त्यावरुन मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर आलो.

त्यानंतर पोनि राठोड यांनी मला त्यांचे रुममध्ये बोलावून रुमच्या खिडक्या दरवाजा व लाईट बंद करून केलेल्या कृत्रीम अंधारात माझ्या हातांची व कापडी पिशवीची तपासणी केली असता माझे उजवे हाताचे बोटाचे पे-यावर व कापडी पिशवीचे तोंडास, आतील बाजुस ठिकठिकाणी अथासीन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर राठोड साहेब यानी माझे व दोन्ही पंचासमक्ष रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले.

एकंदरीत मी आज दिनांक 15:07:2023 रोजी दिलेल्या तक्रारीवरून माझे पत्नीचे नावे असलेली मौजे अबेहोळ शिवारातील शासनाने संपादित केलेल्या जमीनीच्या कोटाने दिलेल्या आदेशाप्रमाणे अधिकचा मोबदला उपविभागीय अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथील खरमाटे साहेब, अकुशे साहेब व नाईक साहेब यांचेकडून मिळून देण्यासाठी अनिरुद्ध अबऋषी कावळे व बाबासाहेब हरिश्चंद्र अंधारे यांनी माझेकडे 2,00,000/-रुपये लाचेची मागणी करून 2,00,000/- रुपये लाच रक्कम सुनील प्लाझा समोर उभी असलेल्या त्यांची चारचाकी गाडी क्रमांक एच एच 25 ए डब्ल्यू 9155 मध्ये स्विकारले असता त्यांना पोलीस निरीक्षक, विकास राठोड पानी लाचेच्या रक्कमेसह पकडले आहे म्हणून माझी 1. अनिरुध्द अवभाषी काय पर 54 वर्ष, मुख रा. केकस्थळवाडी ता. जि. उस्मानाबाद ह.मु. बालाजी नगर, बेंबळी रोड, उस्मानाबाद 2. बाबासाहेब हरिश्चंद्र अंधारे, वय 42 वर्ष, रा. आनंदनगर, गणपती मंदीराजवळ, माणीक चौक, सकपाळ सर यांचे घरी यांचेविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मी माझी फिर्याद देत आहे. हिच माझी फिर्याद असून सदरची फिर्याद मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): Gorshnath Rohidas Kharad

**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): API

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

भागवत नाना जगदाळे

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पपा1132
पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे
आनंद नगर, उस्मानाबाद

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DILIP BABURAO PAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner